(अर्जदाराचे वकीलांनी अशी विनंती केली की, अर्जदाराचा सरतपास नोंदवितेवेळी अर्जदाराचे मोबाईलमधील पेनडाइव्हमध्ये घेतलेल्या डाटाला निशाणी देण्यास गैरअर्जदाराच्या वकीलांनी हरकत घेतली होती. त्यानंतर अर्जदाराने मुळ मोबाईल फोन अभिलेखावर हजर केला आहे, त्यामुळे त्याबाबत पुढील सरतपास घेण्यास अर्जदाराला परवानगी देण्यात यावी. सबब सदर विनंती व त्यातील कारण विचारात घेता पुढील सरतपास घेण्यास परवानगी देण्यात येत आहे.)

**सबब अर्जदारातर्फे साक्षीदार क्रं.१ यांचा पुढील सरतपास अर्जदाराचे वकिल श्री. डी.एम. कुटे यांचे मार्फत.**

२२. मी या प्रकरणात जो मुळ मोबाईल फोन हजर केला आहे तो माझा असून तो माझेच ताब्यातील आहे. निशाणी क्रं.४६ या पेनड्राईव्हमधील डाटा हा माझे सदर मोबाईलमधुन घेण्यात आलेला असून मुळ मोबाईल फोन सदर पेनड्राईव्ह यातील डाटा एकच असून तो बरोबर आहे. त्यातील डाटा मी स्वत:हा निशाणी क्रं.४६ या पेनड्राईव्हमध्ये घेतला आहे. सदर मोबाईल हॅन्डसेटमधील डाटाला **निशाणी क्रं.५५** देण्यात येते.

सरतपास संपला.

**उलटतपास गैरअर्जदारातर्फे वकील श्री ए.सी. एदलाबादकर यांचतर्फे सुरू** :—

२३. या प्रकरणा व्यतीरिक्त मी गैरअर्जदाराविरूध्द इतर कोणताही खटला दाखल केलेला नाही. मी गैरअर्जदार यांचेकडून अकोट येथे राहायला आले त्यानंतर मी गैरअर्जदाराविरूध्द अकोट पोलीस ठाण्यात एक रिपोर्ट दाखल केला आहे. मी नांदुरा येथे नांदत असतांना कोणताही रिपोर्ट दाखल केलेला नाही. माझे बहीणीचे जुळलेले लग्न तोडायला गैरअर्जदार गेले होते, अशा तक्रारीचा रिपोर्ट मी अकोट पोलीस ठाण्यात दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणात मी गैरअर्जदाराविरूध्द जे छळाचे आरोप केले आहे त्याबाबत मी अद्याप पोलीस ठाण्यात कोणताही रिपोर्ट दिलेला नाही. हे प्रकरण न्यायालयात दाखल झाल्यानंतर गैरअर्जदाराकडून मध्यस्थांमार्फत तडजोडीचे प्रयत्न झाले आहे. जर सदर तडजोडीमध्ये सामोपचार झाला असता तरीदेखील मी गैरअर्जदाराकडे

नांदायला गेले नसते. हे म्हणणे खरे नाही की, सुरूवातीपासून गैरअर्जदाराचे मला नांदायला घेवून जातो असेच म्हणणे होते. हे म्हणणे खरे आहे की, गैरअर्जदारातर्फे तडजोडीसाठी जेही लोक आले त्यांनी असे म्हटले की, आम्ही दोघे एकत्र नांदलो तर चांगले राहील व त्यांनी मला एकत्र नांदण्याबाबत म्हटले होते.

२४. हे म्हणणे खरे आहे की, मी एकत्र नांदण्यास नकार दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी नांदुरा येथून अकोट येथे राहायला आले त्यानंतरही गैरअर्जदाराने मला अनेकदा स्वत: असे म्हटले की, मी त्याचेसोबत नांदायला यावे. आज घडीला सुध्दा गैरअर्जदार हा मी म्हणेल ती अट मान्य करून तसे लिहुन देण्यास तयार असला तरीदेखील मी त्याचेसोबत नांदायला जायला तयार नाही. मी नांदुरा हे गाव सोडले त्यावेळी असा ठाम निर्णय करून आलेले नव्हते की, मला नांदुरा येथे परत नांदायला जायचे नाही. मी नांदुरा सोडले त्यावेळी मला अशी आशा होती की, माझा पुन्हा गैरअर्जदारासोबत चांगला संसार होईल.

२५. हे म्हणणे खरे आहे की, माझे व गैरअर्जदाराचे शिक्षण हे समान दर्जाचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, नांदुरा हे गाव व अकोट हे गाव आर्थिक व सामाजिक दृष्टया समान आहे. आमचे लग्न ठरले त्यावेळी माझे वडील हे आय.डी.बी.आय. बॅकेत वरीष्ठ लिपीक म्हणुन कार्यरत होते व गैरअर्जदाराचे वडील हे नांदुरा येथील व्यावसायीक होते. हे म्हणणे खरे आहे की, आज घडीला गैरअर्जदाराचे वडील हयात नाही. त्यांचा मृत्यू हा सन २०१७ साली हृदय विकाराच्या झटक्याने झाला आहे. आमचे लग्नानंतर काही महीन्यांनीच त्यांचे निधन झाले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी गैरअर्जदाराचा भाउ याचे शिक्षण सुरू होते. हे म्हणणे खरे आहे की, घरात सुन म्हणुन मी मोठी होते. हे म्हणणे खरे नाही की, मी नांदुरा येथे राहत असतांना माझी गैरअर्जदाराचा भाउ अमीत वगैरअर्जदाराची आई यांचेबाबत कोणतीही तक्रार नव्हती. माझे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदाराच्या आईने सुध्दा माझा छळ केला. गैरअर्जदाराचे भाउ अमीत यांचे लग्न होवून ते त्यांच्या संसारात लक्ष देत होते म्हणुन माझे छळात त्यांचा सहभाग नाही परंतु माझे बहीणीचे लग्न तोडण्यासाठी गैरअर्जदार गेले होते

त्यावेळी अमीतचा जास्त सहभाग होता. माझे बहीणीचे लग्न तोडण्याची जी घटना मी कथन करीत आहे त्या घटनेची तारीख किंवा साल आता मला आठवत नाही. सदर घटना ही प्रस्तुतचे प्रकरण दाखल करण्या अगोदरची घटना आहे. मी नांदुरा येथे राहत असतांना ज्या काही तथाकथीत छळाच्या घटना घडल्याचे मी कथन करीत आहे त्याबाबत आमचेकडून समझोत्याचे प्रयत्न झाले होते.

२६. माझे आत्याचे पती महेन्द्र ठाकरे यांचेकडून व माझे आई—वडीलांकडून तसा प्रयत्न झाला होता. त्यामध्ये इतर कोणतेही नातेवाईक सहभागी नव्हते. मला काका, मामा हे नातेवाईक आहेत. हे मला माहीत नाही की, गैरअर्जदाराकडून समझोत्यासाठी माझे काकांकडे व मामांकडे प्रयत्न करण्यात आला होता. माझे मोठया बहीणीचे नांव पल्लवी सतीष म्हैसणे असे आहे. तिच्या पहील्या पतीचे नाव राज घ्यार असे होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे बहीणीचा व राज घ्यार यांचा घटस्फोट झाला. हे म्हणणे खरे नाही की, राज घ्यार हे आमच्या समाजाचे नव्हते. गैरअर्जदाराचे असे म्हणणे होते की, त्यांच्याकडील पाहुणे जास्त आहेत म्हणुन त्यांच्या मागणीप्रमाणे आमचे लग्न नांदुरा येथे झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दोन्ही पक्षांनी लग्नाचा अर्धा—अर्धा खर्च करायचा असे त्यावेळी ठरले होते. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, लग्नाचा खर्च म्हणुन त्यावेळी त्यांनी रूपये दोन लाखाची मागणी केली होती. माझे वडीलांनी सदर दोन लाख रूपये दिले होते. ते बॅक खात्यामध्ये वर्ग करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, जवळपास पाच ते सहा हजार लोकांच्या उपस्थितीत थाटामाटात आमचे लग्न झाले.

२७. सदर लग्नात गैरअर्जदाराकडून मला एक नेकलेस, मंगळसुत्र व कानातले, अंगठी असे सोन्याचे दागिने घालण्यात आले होते. मी माझे पुराव्यात जे गैरअर्जदारास माझे वडीलांनी सोन्याचा २० ग्रॅम वजनाचा गोप व सोन्याची ७ ग्रॅम वजनाची अंगठी दिल्याचे सांगत आहे. त्याबाबत माझेकडे कागदोपत्री पुरावा आहे. तो पुरावा अद्याप या प्रकरणात अभिलेखावर दाखल केलेला नाही. मी बंटी रामचंदानी व त्यांची पत्नी विरा रामचंदानी यांना ओळखते. मी नांदुरा येथे नांदत असतांना माझा विरा रामचंदानी यांचेशी सततचा संपर्क होता. बंटी रामचंदानी व त्यांची पत्नी विरा रामचंदानी यांचेकडे माझे नेहमी जाणे—येणे व्हायचे. हे म्हणणे

खरे आहे की, मी नांदुरा येथे नांदत असतांना लॉयन्स क्लब, नांदुरा चे सभासदत्व माझेकडे होते. त्या क्लबच्या कार्यक्रमाला मी व गैरअर्जदार सोबत जायचो. मी गर्भवती असतांना माझेवर नांदुरा येथील डॉ. संजीवनी नांदुरकर यांचेकडे उपचार करण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, माझे व गैरअर्जदाराच्या दरम्यान पहीला खटका हा चिखलदराच्या विषयावरून उडाला होता.

२८. मी नांदुरा येथे असतांना माझे सास—यांच्या हयातीत मला नोकरी करू द्या, अशी मागणी केली नव्हती. हे मला माहीत नाही की, माझे सास—यांच्या हयातीत गैरअर्जदाराचे कुटूंबाची आर्थिक परीस्थीती चांगली होती व त्यांच्या निधनानंतर सदर कुटूंबाची आर्थिक परीस्थीती बिघडली. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदाराने माझे समक्ष कधीही ठेकेदारी व कॉन्ट्रक्टरशिप घेतलेली व केलेली नाही. हे प्रकरण दाखल झाल्यानंतर अंदाजे तीन ते चार वेळा गैरअर्जदार हा माझेकडे मुलीच्या भेटीसाठी आला होता. गैरअर्जदाराने त्याला मुलीचा ताबा मिळावा म्हणुन माझे विरूध्द पिटीशनसुध्दा दाखल केले होते.
प्रश्नः— तुम्ही मुलीचा ताबा गैरअर्जदाराला देण्यास तयार राहाल काय ?
उत्तरः— ती मुलीची इच्छा राहील.

२९. आज घडीला माझी मुलगी ७ वर्ष वयाची आहे. माझे शिक्षण पुर्ण झाल्यानंतर पासून ते आज अखेरपर्यंत मी कुठेही नोकरी केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी नोकरी व्यवसाय करण्यास शारीरीक व मानसीक दृष्टया सक्षम आहे. घटस्फोटाची मागणी पहील्यांदा गैरअर्जदाराने केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ त्या कारणाने मी दुखावल्या गेले म्हणुन मी हे प्रकरण दाखल केले आहे.

३०. हे म्हणणे खरे नाही की, चिखलदरा हा जंगलाचा भाग असल्यामुळे रात्रीच्यावेळी प्रिवेडींगसाठी बाहेर जाण्यास गैरअर्जदाराने मनाई केल्यामुळे आमचे दरम्यान वाद झाला होता. मी, माझी बहीण, होणारे जावाई व फोटोग्राफर असे चौघे आम्ही चिखलदरा येथे गेलो होतो. तेथे आम्ही मुक्काम केला होता. कल्याणी अरूण पिंगळे हे नांव मला नातेवाईकांकडून कळाले होते.

३१.	हे म्हणणे खरे आहे की, मोबाईलमध्ये ज्या इमेजेस असतात त्या वेगवेगळया ॲपद्वारे मॉर्फ करता येतात. गैरअर्जदार हा नांदुरासोडून मी म्हणेल त्या ठिकाणी माझे सोबत नांदायला तयार असला तरी मी नांदायला तयार नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, कारण त्याने दुसरे लग्न केले आहे.

३२.	हे म्हणणे खरे नाही की, मी नांदुरा येथे नांदत असतांना गैरअर्जदार व त्याचे वडीलांसोबत विक्षीप्त वर्तन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदाराचा छळ केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, कोणतेही सबळ कारण नसतांना मी नांदुरा सोडून माझे हट्टापाई अकोट येथे वेगळी राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदाराला संसार सुखापासून व मुलीच्या प्रेमापासून वंचीत केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कथन करते तसा कोणताही छळ गैरअर्जदाराने किंवा त्याचे कुटूंबीयांनी केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमचा विवाह संबंध कायमस्वरूपी संपुष्टात येणेइतपत परीस्थीती उद्‌भवली नव्हती व नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे प्रकरण दाखल केले आहे व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वा/—
( महेश एस. काळे )
सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)
अकोट.

दिनांक २९.०१.२०२६